**Shivaji University, Kolhapur.**
**Dept. of Journalism and Mass Communication**

**One Day Workshop on Environmental Communication**

**Date- 12-05-2023**








**Inauguration of Workshop**



**Prof. Dr. Jay Samant**




**Dr. V.N.Shinde**




**Dr. Asavari Jadahv**




**Uday Gayakwad**




**Prof. Dr. P. D. Raut**

# Media Publicity



# निसर्गाने आखून दिलेली रूपरेषा ओलांडल्यास जीवन धोक्यात

## डॉ. जय सामंत; शिवाजी विद्यापीठात 'पर्यावरण संवाद'वर कार्यशाळा

कोल्हापूर,ता. १५ : 'पर्यावरणाच्या साखळीत माणूस हा शेवटचा घटक असूनही आपण निसर्गाच्या विरोधात जाऊन निसगनि आखून दिलेली रूपरेषा ओलांडत आहोत. त्यामुळे येणाऱ्या काळात मानवाचे भवितव्य धोक्यात आहे. यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरणाच्या जागतिक परिषदांच्या शाश्वत विकासाची उद्दिष्टे, मार्गदर्शक तत्वे लक्षात घेऊन प्रत्येक राष्ट्राने पर्यावरणविषयक जबाबदाऱ्यांबाबतही एकनिष्ठ राहिले पाहिजे', असे मत ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ प्रा. डॉ. जय सामंत यांनी व्यक्त केले.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील 'पर्यावरण संवाद' या विषयावरील कार्यशाळेच्या उदघाटनप्रसंगी डावीकडून डॉ. सुमेधा साळुंखे, शिवाजी जाधव, जय सामंत, व्ही. एन. शिंदे , निशा पवार, परशराम पवार उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठातील जर्नलिझम अँड मास कम्युनिकेशन विभागातर्फे मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित 'पर्यावरण संवाद' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. 'शास्त्रज्ञांनी नवनवीन शोध लावले. त्यामुळे मानवी जीवन सुलभ झाले असले, तरी भौतिक सुखाच्या हव्यासापोटी साधने हळूहळू संपत चालली आहेत. त्यामुळे प्राथमिक गरजांचे संवर्धन करणे म्हणजे पर्यावरणाचे संवर्धन करणे असल्याचे प्रभारी कुलगुरू डॉ. विलास शिंदे यांनी सांगितले. विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी 'पर्यावरण आणि माध्यमे' याविषयावर मार्गदर्शन केले. पर्यावरणतज्ज्ञ उदय गायकवाड यांनी पर्यावरणविषयक भारतातील चळवळींबाबत मार्गदर्शन केले. पर्यावरण संवर्धन ही सर्वांची जबाबदारी असून याबाबत समाजात जागृती करणे गरजेचे असते. यासाठी पर्यावरण चळवळी महत्वाच्या ठरतात, असे त्यांनी सांगितले. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी एसयुके रिसर्च व डेव्हलपमेंट फौंडेशनचे सीइओ डॉ. पी. डी. राऊत यांनी माध्यमातील पर्यावरण विषयक आशय आणि समस्या यावर मार्गदर्शन केले.

जर्नलिझम अँड मास कम्युनिकेशन अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. परशराम पवार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.

**Sakal 16-05-2023**

तरुण भारत संवाद

# पर्यावरणीय जबाबदाऱ्यांशी एकनिष्ठ रहा

## डॉ. जय सामंत यांचे प्रतिपादन, विद्यापीठात पर्यावरण संवाद कार्यशाळा उत्साहात

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

पर्यावरणाच्या साखळीत माणूस हा शेवटचा घटक आहे. पण याच घटकाकडून निसर्गाने आखून दिलेल्या रूपरेषांचे उल्लंघन होत आहे. त्यामुळे मानवी जीवन धोक्यात आले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाची शाश्वत विकासाची उद्दिष्टे अन् मार्गदर्शक तत्वे अनुसरत प्रत्येक देशाने पर्यावरण विषयक जबाबदाऱ्यांशी एकनिष्ठ राहिले पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. जय सामंत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागाच्यावतीने शुक्रवारी मानव्यशास्त्र सभागृहात 'पर्यावरण संवाद' कार्यशाळा झाली. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. यावेळी विभागप्रमुख डॉ. निशा मुडे पवार, डॉ. सुमेधा साळुंखे, प्रा. परशराम पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी पर्यावरण संवाद कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. जय सामंत. शेजारी प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. निशा पवार–मुडे, डॉ. सुमेधा साळुंखे, प्रा. परशराम पवार.**

डॉ. सामंत म्हणाले, निसर्गाला वाचवण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती आवश्यक बनली आहे. त्यासाठी माध्यमांनी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रभारी कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, नवनवीन शोधांमुळे मानवी जीवन सुलभ झाले आहे. पण भौतिक सुखाच्या हव्यासापोटी साधने संपत निघाली आहेत. त्यामुळे प्राथमिक गरजांचे पर्यायाने पर्यावरणाचे संवर्धन आवश्यक आहे. पण यावर कोणी बोलत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

कार्यशाळेत पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड, एसयुके रिसर्च व डेव्हलपमेंट फौंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. पी. डी. राऊत यांनी मार्गदर्शन केले. विभाग प्रमुख डॉ. निशा मुडे–पवार यांनी स्वागत केले. प्रा. परशराम पवार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.

**Tarun Bharat 13-05-2023**